**वादी तर्फे साक्षीदार क्र. १ चा उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री. डी.एम. सोनवणे यांचे तर्फे शपथेवर सुरू**

जमनाबाई दिगंबर करे ही माझी चुलती होती. प्रतिवादी हे सन १९८६ ते ३१.०५.२०१६ पर्यंत सैन्य दलामध्ये होते. ते सध्या सेवानिवृत्त आहेत. प्रतिवादी हे सध्या शेती व्यवसाय करतात. हे म्हणणे खरे आहे की, मौजे उमरड येथील गट नं. २८६ पैकी ०१हे. ०७आर. ही जमिन जमनाबाई करे यांना त्यांचे पती मयत झालेनंतर मिळाली. दि. १५.०३.२००५ रोजी जमनाबाई यांनी त्यांना शासनाकडून मिळालेली जमिन ०१हे. ०७आर. प्रतिवादीस विक्री केलेबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदी खताच्या व्यवहाराबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदी खतावेळी जमनाबाई यांना मी स्वतः गाडीवर घेवून आलो. सदर खरेदी खताचा मजकुर जमनाबाई यांनी सांगितला होता याबात मला माहिती नाही. आता मला दि. १५.०३. २००५ चे खरेदी खत क्र. १०४१/२००५ दाखविला त्यावरील साक्षीदार क्र. १ म्हणुन असलेली सही दाखविली ती माझी नाही. सदर खरेदी खताच्या वेळी महादेव ढाणे, गौतम बदे व साहेबराव मारकड हे हजर होते याबाबत मला माहिती नाही. सदर खरेदी खतावरील खरेदी देणार म्हणून दाखविलेला फोटा हा जमनाबाई यांचाच आहे. दि. २९. ०५.२००८ रोजी माझी चुलती जमनाबाई यांनी तहसिलदार करमाळा यांचे समक्ष दिलेल्या प्रतिज्ञापत्राबाबत मला माहिती नाही. सदर प्रतिज्ञापत्रावरील फोटो आता मला दाखविला तो जमनाबाई यांचा आहे.

हे म्हणणे खरे नाही की, दि. १५.०३.२००५ रोजीच्या खरेदी खताच्या वेळी मी हजर होतो व सदर दिवशी जमनाबाई यांनी प्रतिवादीस प्रस्तुत मिळकतीचा ताबा दिला होता. सदर खरेदी खत हे नविन शर्तीच्या जमिनीचे असल्याने प्रस्तुत खरेदी खताची नोंद महसुल सदरी झाली नसल्याबाबत मला माहिती नाही. जमनाबाई मयत झाल्याची तारीख मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, जमनाबाई मयत झालेनंतर त्यांचे नाव ७/१२ सदरी असल्याचा गैरफायदा घेवून त्यांचे वारस म्हणून नोंद होणेकामी मी न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २२/२०१८ दाखल केला होता. सदर अर्जामध्ये प्रतिवादी यांना पक्षकार म्हणुन सामील केलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला खरेदी खताची माहिती असताना देखील मी जाणीपूर्वक प्रतिवादी यांना सामील केले नाही.

प्रतिवादी सैन्य दलात असल्याने त्यास सहा—सहा महिने सुट्टया मिळत नसतात याची मला माहिती नाही. प्रतिवादी सेवानिवृत्त झालेपासुन ते सन २०१९ पर्यंत मुलांच्या शिक्षणाकरिता पुणे येथे राहत असलेबाबत मला माहिती नाही. प्रतिवादी हे सन २०१६ ते २०१९ या कालावधी मध्ये पुणे येथून उमरड येथे येवून शेती करत असलेबाबत मला माहिती नाही. मला केडगांव गावातील माहिती आहे. तसेच मला उमरड येथील देखील माहिती नाही. प्रतिवादी हे सन २०१९ पासुन मौजे उमरड येथे राहत असलेबाबत मला माहिती नाही. मी वादमिळकतीच्या चतु:सिमा सांगू शकत नाही. वादमिळकतीच्या शेजारी कुंदन शेख यांची शेती आहे. कुंदन शेख हा उमरड गावचे आसपास असणा—या गावातील लोकांना माहिती आहे.

मी दावा मिळकती करिता पाणी शेजा—याकडून घेत नाही. माझे शपथपत्रामध्ये पाणी शेजा—याकडून घेत असले बाबतचा मजकुर मला आठवत नाही. दावा मिळकती पैकी अडीच एकर क्षेत्रात उसाचे पिक घेतले आहे. मी दावा मिळकती मध्ये प्रथमत: मागील वर्षी उसाचे पिक घेतले. दावा मिळकतीच्या पुर्वेस कोणता शेतकरी आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदी खताच्या वेळी जमनाबाई या वयस्कर असल्याने त्यांना औषधोपचारासाठी पैशाची गरज होती. हे म्हणणे खरे नाही की, माझी चुलती जमनाबाई यांची मौजे केडगांव येथे जमिन होती व ती त्यांनी मला दिली होती. मौजे केडगांव येथे माझे नावे एका गटात जमिन आहे.

हे म्हणणे खरे आहे की, माझे नावे केडगांव येथे गट नं. ११, ७७, ८० मध्ये जमिनी होत्या. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ११ पैकी माझे नावे असलेले क्षेत्र मी विक्री केले. हे म्हणणे खरे आहे की, केडगांव येथे माझे नावे असलेल्या जमिनीवर माझे नावे बॅका व पतसंस्थाचे कर्ज काढले आहेत व ते थकीत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी वादमिळकतीमध्ये कधीही गेलेलो नसल्याने त्यामुळे वादमिळकतीबाबतच्या बाबी मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जमनाबाई यांनी प्रतिवादी यांना दिलेल्या खरेदी खताबाबत माहित असताना देखील मी खोटे वारस प्रमाणपत्र न्यायालयाकडून प्राप्त केले व त्याचा आधार घेवून प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीमध्ये मध्ये उसाचे पिक घेतलेचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण,
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत्त

(एम.पी.एखे)

दि.१७.०१.२०२४ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा